मंगळवार, २१ ऑक्टोबर २०१४

# पुण्य नगरी

## औरंगाबाद वृत्तवेध

# बालकामगार विद्यार्थ्यांना डॉएच्च बँकेचा मदतीचा हात



औरंगाबाद/प्रतिनिधी

आझाद अली शाह शिक्षण संस्था संचलित राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शाळा मिस्बाह कॉलनी, पडेगाव, औरंगाबाद, निसर्ग कॉलनी, लालमाती, भावसिंगपुरा या संक्रमण शाळेतील सर्व बालकामगार विद्यार्थ्यांना डॉएच्च बँकेच्या वतीने नोटबुक, पालकांसाठी जुने कपडे आणि स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉएच्च बँकेचे एरिया मॅनेजर राजीव गुप्ता, विशाल बसरकर, मुश्ताक शेख, पंकज दीक्षित, कौस्तुभ कुलकर्णी, शशांक गोस्वामी, सत्यप्रकाश दुबे, सुनील जैस्वाल संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या आणि संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम आलेल्या पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिक्षिका शुभांगी कुलकर्णी यांनी संस्थेचा व शाळेचा अहवाल वाचून दाखविला. सूत्रसंचालन आरिफ शेख यांनी केले, तर आभार रत्नमाला सुरडकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुकिम पटेल, नसरीन, सय्यद झिनत, फरहिन शेख, रिजवाना मन्सुरी, सय्यदा अफसर, सय्यदा रुबी, माया आवाड, सोनम गंगावणे, अमरीन शेख, सुष्मा गवई, मीना भालेराव, छाया देहरे आदींनी परिश्रम घेतले.